**Dr. Kirit Somaiya**
*B.Com, FCA, Ph.D.*
Ex-Member of Parliament
Convenor, BJP Investors' Cell
Member, National Executive

**Bharatiya Janata Party**
**भारतीय जनता पार्टी**

प्रसिद्धीसाठी

मे २४, २००७

# मिठी टप्पा २ – केवळ ५ टक्के काम पूर्ण -डॉ. किरीट सोमैय्या

मोठ्या घोषणा, पोकळ दावे, नोव्हेंबर २००६ मध्ये निविदा मागविणे एवढे करूनहि महाराष्ट्र सरकारच्या मिठी प्राधिकरणाने मिठी नदीच्या दुसऱ्या टप्प्याचे काम केवळ ५ टक्के पूर्ण केले आहे. भाजप नेते आणि माजी खासदार डॉ. किरीट सोमैय्या यानी आज ही गोष्ट उघडकीला आणली. ही मोठी दयनीय बाब आहे कि, मिठी नदीच्या रुंदीकरणासाठी आणि खोली वाढविण्यासाठी २६,०९,००० घनफूट गाळ काढून वाहून नेण्यासाठी कार्यादेश-कंत्राटे दिल्यानंतरहि केवळ २,०६,७०० घनफूट गाळ आतापर्यंत काढण्यात आला आहे. यापैकी केवळ १,०४,२५० घनफूट डंपिंग ग्राउंडमध्ये हलविण्यात आला आहे.

### एमएमआरडीएचे काम म्हणजे निव्वळ धूळफेक

एमएमआरडीएचे मिठी नदीचे काम म्हणजे केवळ धूळफेक आहे. २३,३०,००० घनफूटांसाठी कार्यादेश-कंत्राट असताना एमएमआरडीएने केवळ १,०५,००० घनफूट गाळ काढला आहे आणि १९,७५० घनफूट वाहून नेला आहे. डॉ. सोमैय्या यानी असा आरोप केला कि ही मुंबईकरांची केवळ थट्टा आहे.

### एमएमआरडीए डंपिंग ग्राउंडच्या शोधात

धक्कादायक, पण सत्य हे आहे कि, एमएमआरडीएने मिठी नदीच्या पात्रातील गाळासाठी अजून जागाच नक्की केलेली नाही. एमएमएआरडीएने टप्पा १ च्या अनुभवातून काहीच धडा घेतलेला नाही हे यातून दिसून येते. सीएजी ने एमएमएआरडीएच्या टप्पा १ च्या कामाबाबत ताशेरे ओढले आहेत आणि सविस्तर अहवाल मागविला आहे. टप्पा १ मध्येसुध्दा एमएमआरडीएने डंपिंग ग्राउंड निश्चीत केले नव्हते आणि त्यातूनच एमएमआरडीएचा मिठी घोटाळा उद्भवला.

एप्रिल २००७ मध्ये एमएमआरडीएने कोपरखैराने येथे मिठी नदीतील गाळ टाकण्याचा प्रयत्न केला, ज्याला नवी मुंबई नगरपालिकेने हरकत घेतली. त्यानंतर, एमएमआरडीएच्या आयुक्तानी मुंबई महापालिकेच्या नवीन आयुक्ताना कांजूर किंवा देवनार डंपिंग यार्डचा उपयोग करण्याची परवानगी मागितली. आणि आता ते ठाण्यातील बाळकुम येथे गाळ टाकण्याचा प्रयत्न करीत आहेत, पण ते सुध्दा फार काळ चालणार नाही.

### बेकायदेशीर बांधकामे तोडणे

बेकायदेशीर अतिक्रमणे उठविण्याची कथा काही वेगळी नाही. डॉ. सोमैय्या यानी जाहीर केले कि ५,५०० बांधकामे उठविल्याबाबत मोठमोठे दावे आणि घोषणा केल्यानंतरहि आजपर्यंत एकाहि बांधकामाला हात लावण्यात आलेला नाही.
राज्य सरकारच्या बेजबाबदार वर्तनाची भाजपला चिंता वाटते, ज्याचा परिणाम या पावसाळ्यात पाणी तुंबणे आणि पूर येण्यात होणार आहे.

डॉ. किरीट सोमैय्या यानी उच्च न्यायालयात दाखल केलेल्या विनंती अर्जाचा परिणाम २००५-०६ मध्ये १ ल्या टप्प्यात मिठी नदीतून १२,९६,४४० घनफूट गाळ काढून ती रुंद आणि खोल करण्याचे काम करण्यात आले.

**प्रसिध्दी सचिव**

**BJP Office :** ŏ 11, Ashoka Road, New Delhi 110
Č **Please Reply :** 9C, Neelam Nagar, Mulund (E), Mumbai 400 081- Tel: 25646651/21634152/(M) 9869220027
Email: kirit@vsnl.in, kiritsomaiya@gmail.com Website : www.kiritsomaiya.com